# शेतमजुरांच्या किमान वेतनाचा प्रश्न

भारत हा शेतीप्रधान देश. परंतु ब्रिटिश राजवट भारतात स्थापन होण्यापूर्वी शेतीबरोबरच कारागिरी व्यवसाय, वाहतूक व्यवस्था इत्यादी बिगरशेती व्यवसायांवर बरीच लोकसंख्या अवलंबून होती. ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर मात्र पारंपरिक अर्थव्यवस्थेस धक्का बसला. भारत देश इंग्लंडमधील यंत्रोत्पादित कापडाची हुकुमी बाजारपेठ बनला आणि देशातील विणकर धंदा बुडीत निघाला. इतरही कारागिरी व्यवसाय बसले. परिणामी शेतीवर अवलंबून असलेल्यांची संख्या वाढत गेली. नवीन कायदेकानू आणि जमीनधारा पद्धती यामुळे जमीनदार व मारवाडी–व्यापारी ह्यांचे वर्चस्व वाढले आणि कर्जापोटी जमिनी गमावल्याने कुळांची संख्या वाढत गेली. जमिनीचे तुकडे पडत गेले व जमिनीवर पोट भरता येईना. त्यामुळे शेतमजुरांची संख्या वाढत गेली. १८८२ मध्ये भारतात शेतमजुरांची संख्या ७५ लाख होती, ती १९३१ मध्ये ३३० लाख झाली. (आकडे फाळणीपूर्व भारताचे)

स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनेद्वारे औद्योगीकरणावर भर दिला गेला. तरी बिगरशेती व्यवसायांमध्ये भांडवलप्रचुर तंत्र मुख्यत्वे वापरले गेल्याने रोजगार मोठ्या प्रमाणात वाढला नाही. वाढत्या कामकरी संख्येस बिगर शेती व्यवसायांत फारशा प्रमाणात प्रवेश न मिळाल्याने शेतीवरील अवलंबितांची संख्या वाढत गेली. जमिनीची तुकडेमोड होत राहिली व शेतमजुरांची संख्या वाढतच राहिली. १९६१ मध्ये भारतात ३१५ लाख शेतमजूर होते तर १९८१ मध्ये त्यांची संख्या ५५४ लाख झाली.



## महाराष्ट्रातील शेतमजूर

महाराष्ट्र राज्य हे भारतातील एक पुढारलेले व उद्योगप्रधान राज्य. तरीही महाराष्ट्रातील सुमारे ६० टक्के कुटुंबे शेतीवरच अवलंबून आहेत. १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण कामकऱ्यांची संख्या व शेतकरी–शेतमजुरांची संख्या तक्ता क्र. १ मध्ये दिली आहे.

१९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये ६५ लाख कामकरी शेतमजुरी हा प्रमुख व्यवसाय असलेले आढळले. शिवाय शेतकऱ्यांपैकी निम्मे लहान शेतकरी, त्यांपैकी अनेकांचा शेतमजुरी हा दुय्यम व्यवसाय. शेतमजुरांमध्ये स्त्रियांचे प्रमाण फार मोठे आहे. शेतमजूर वगळता एकूण कामकऱ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण १८% तर शेतमजुरांमध्ये ते ५२% एवढे आहे. शेतमजुरीच्या दराचा प्रश्न म्हणजे महाराष्ट्रातील एक तृतियांशाहून

तक्ता क्र. १ कामकरी, शेतकरी व शेतमजूर यांची संख्या (१९८१)

| | महाराष्ट्र राज्य | | | भारत |
|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | एकूण |
| एकूण लोकसंख्या (आकडे हजारात) | ३२३५८ | ३०३५७ | ६२७१५ | ६५८१४१ |
| एकूण कामकरी (,,) | १६८७२ | ७४०५ | २४२७७ | २२००८२ |
| शेतकरी (,,) | ५६६५ | २७९३ | ८४५८ | ९१३९४ |
| शेतमजूर (,,) | ३१३२ | ३३७३ | ६५०५ | ५५३७१ |
| एकूण कामकऱ्यांमध्ये | | | | |
| शेतकऱ्यांची टक्केवारी | ३३.५ | ३७.७ | ३४.८ | ४१.५ |
| शेतमजुरांची टक्केवारी | १८.५ | ४५.५ | २६.८ | २५.२ |
| बिगरशेती कामकऱ्यांची टक्केवारी | ४८.० | १६.८ | ३८.४ | ३३.३ |

अधिक लोकसंख्येच्या जीवनाचा प्रश्न आहे. ह्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा विचार महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात १९७० सालपर्यंत जवळजवळ झालाच नव्हता.

## किमान वेतनाचा प्रश्न

निरनिराळ्या उद्योग व व्यवसायांत अत्यंत कमी वेतनावर कामकऱ्यांना राबवून घेतले जाते. परंतु कामकरी असंघटित व दुर्बल असल्याने आपल्यास किमान वेतन तरी मिळावे यासाठीही ते झगडू शकत नाहीत, अशा कामगारांस किमान संरक्षण देण्याच्या दृष्टीने १९४८ साली भारत सरकारने किमान वेतन कायदा केला. निरनिराळे उद्योग व व्यवसाय यांचा अभ्यास करून जरूर त्या त्या उद्योग–व्यवसायासाठी राज्य सरकारचे किमान वेतन निश्चित करावे व त्याची अंमलबजावणी यंत्रणा उभारावी अशी तरतूद १९४८ च्या कायद्याद्वारे केली.

छापखाने, बिडी–उद्योग, बांधकाम, दुकाने इत्यादी व्यवसायांसाठी निरनिराळ्या राज्यांत किमान वेतन ठरविण्यात आले. शेती व्यवसायाबाबत काही राज्यांतून समित्या नेमल्या जाऊन आवश्यक ती कायदेशीर तरतूद करण्यात आली. उदाहरणार्थ, केरळमध्ये १९५६ साली पहिली वेतन समिती नेमण्यात आली आणि १९६१ मध्ये दुसरी वेतन समिती नेमली, तर म्हैसूर राज्यात १९५९ मध्ये किमान वेतन समिती नेमण्यात आली.

महाराष्ट्र राज्यात शेतमजुरांचे किमान वेतन नेमून द्यावे ह्या मागणीवर ठाणे जिल्ह्यातील आदिवासींनी कम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वाखाली प्रदीर्घ लढा दिला आणि ह्या संघटित लढ्याच्या दबावाखाली १९५३ मध्ये मुंबई राज्य सरकारने उंबरगाव व डहाणू तालुका व मोखाडा पेटा यासाठी किमान वेतनाचे दर नेमून दिले. नांगरणी, वखरणी इत्यादी जड कामांसाठी रोजी १ रुपया, निंपणी, वेचणी अशा कामांसाठी १२ आणे व मुलांसाठी ८ आणे असे दर ठरवून देण्यात आले. १९५४ मध्ये परभणी, अमरावती, यवतमाळ ह्या जिल्ह्यांत किमान वेतन ठरविण्यात आले. पुढील १०।१२ वर्षांत राज्य सरकारने याबाबत काही विचार केला नाही. १९६५–६६ च्या दुष्काळामध्ये महाराष्ट्रातील शेतमजूर आपल्या मूलभूत मागण्यांवर एकत्रित आले आणि रोजगाराची हमी व किमान वेतन ह्या मागण्या जोराने पुढे आल्या.

## पागे समिती

१९७१ साली शेतमजुरांचे किमान वेतन ठरविण्यासाठी श्री. पागे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने एक समिती नेमली. समितीचे सदस्य विधिसभेच्या सभासदांमधून नेमले, शेतमजूर संघटनांना त्यावर प्रतिनिधित्व नव्हते.

पागे समितीने महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागास भेटी देऊन किमान वेतनाच्या प्रश्नावर चर्चा केली, मते अजमावली व आपला अहवाल १९७३ मध्ये सादर केला. त्यामध्ये सुचविलेले दर पुढीलप्रमाणे होते.

| विभाग | दिवसाचा किमान वेतन दर (रु.) (प्रौढ व्यक्तीस) |
|---|---|
| १) कॉर्पोरेशन, 'अ' वर्ग नगरपालिका व कँप विभाग | ३.५ |
| २) उर्वरित (१ व ३ सोडून) विभाग | ३.०० |
| ३) अवर्षणप्रवण विभाग | २.५० |

१९७४ साली महाराष्ट्र सरकारने किमान वेतन कायदा राज्यभर लागू केला. किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी मुख्यतः कामगार आयुक्तांच्या कार्यालयामार्फत नेमण्यात आलेल्या निरीक्षकांकडून करण्याची यंत्रणा मुक्रर केली. शासनाने कामगार आयुक्तांच्या कार्यालयात एक ग्रामीण विभाग उघडला व त्यासाठी एक स्वतंत्र कामगार उप आयुक्त, एक कामगार अधिकारी व एक किमान वेतन निरीक्षक नियुक्त केले. शेतमजुरांच्या किमान वेतनाचे निरीक्षण ग्रामसेवकांकडून व गट विकास अधिकारी यांचे मार्फत केले जाऊन कामगार आयुक्त त्यामध्ये सुसूत्रता आणण्यास जबाबदार. परंतु ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांना नेहमीची अनेक कामे असल्याने किमान वेतन देखरेखीच्या कामासाठी त्यांना सवड मिळत नाही आणि परिणामी एखाद्या शेतमजुराची तक्रार आली तर त्याची चौकशी होण्याची 'पोलिसी' पद्धतीची यंत्रणा असे त्याचे स्वरूप झाले. शिवाय तक्रार केल्यावर योग्य तो तपास होऊन त्याचे निराकरण होते की नाही हा प्रश्न राहतोच.

## दुसरी पागे समिती

पागे समितीने आपला अहवाल तयार केल्यानंतरच्या काळात किमतींची पातळी झपाट्याने वाढत गेली आणि किमान वेतनाचा दर वाढवून मिळण्यासाठी जोराने मागणी पुढे येऊ लागली. १९७७ मध्ये राज्य सरकारने दुसरी पागे समिती नेमली. त्यांनी पुढीलप्रमाणे सुधारित दर सुचविले; ते सुचविताना विभागांची काही प्रमाणात पुनर्रचना केली.

| विभाग | दिवसाचा किमान वेतन दर (रु.) |
|---|---|
| १) महानगरपालिका क्षेत्र, पुणे–खडकी, कँप क्षेत्र व बारमाही कायम पाणीपुरवठा असलेला विभाग | ५.२५ |
| २) 'अ' व 'ब' वर्गीय नगरपालिका व इतर कँप क्षेत्र आणि हंगामी पाणीपुरवठा असलेला विभाग | ४.७५ |
| ३) उर्वरित (१, २, ४ विभागांतील क्षेत्रे वगळून) | ४.२५ |
| ४) सुखटणकर समितीने★ अवर्षण–प्रवण व दीर्घकाल टंचाईग्रस्त म्हणून जाहीर केलेले क्षेत्र | ३.७५ |

★ राज्य सरकारने अवर्षणप्रवण विभागाची पाहणी करण्यासाठी नेमलेली समिती (१ ७३).

१९७८ मध्ये राज्य सरकारने सुधारित दर लागू केले. त्यानंतरच्या काळात किंमतवाढ चालूच होती. तेव्हा १९७९ मध्ये राज्य सरकारने तिसरी पागे समिती नेमली व तिचा अहवाल ३१ जानेवारी १९८२ ला सादर झाला. तो अजून प्रसिद्ध झालेला नाही. परंतु त्यासंबंधीची सारांशाने माहिती व त्यावरील टीकात्मक लेख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत. पागे समितीने केलेल्या शिफारशींसंदर्भात अनेक वादग्रस्त प्रश्न पुढे आले आणि गेले तीन-चार महिने ह्या प्रश्नावर बरीच चर्चा चालू आहे. ह्या जिव्हाळ्याच्या प्रश्नासंदर्भातील काही महत्त्वाच्या मुद्यांविषयीचे थोडक्यात विवेचन पुढे केले आहे.

## किमान वेतन कसे ठरवायचे ?

ह्या प्रश्नाला सहज सुचणारे उत्तर म्हणजे किमान मानवी गरजा पुऱ्या होतील एवढे वेतन. यामध्ये शरीरप्रकृती उत्तम राहील असा आहार, निवारा, औषधपाणी, कपडे, पादत्राणे, साबण इत्यादी व्यक्तिगत गरजेच्या वस्तू व शिक्षण, वृत्तपत्रे यांसारख्या शैक्षणिक व सांस्कृतिक गरजेच्या गोष्टी यांचा समावेश होतो

किंमतीची प्रचलित पातळी लक्षात घेऊन वरील गरजा पुरविण्यासाठी पुरेसे वेतन प्रत्येक कुटुंबास मिळाले पाहिजे ही किमान अपेक्षा.

पुढचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आहार, कपडा, निवारा इत्यादीबाबतच्या किमान गरजा कशा ठरवायच्या ? शरीरव्यापार व आरोग्यरक्षण विचारात घेऊन त्या गरजा स्थूलमानाने ठरविता येतात. अर्थात् व्यक्ती-व्यक्तींमध्ये याबाबत फरक आढळून येतात. परंतु स्थूलमानाने सरासरी काढता येते. माणसाला दिवसभर केवळ पडून राहिले तरी शारीरिक चलनवलनासाठी काही किमान अन्नाची गरज असते. त्याशिवाय माणूस करतो ते काम किती श्रमाचे आहे त्यानुसार अधिक अन्नाची जरुरी पडते. निरनिराळ्या प्रकारच्या कामासाठी किती ऊर्जा लागते याचा अभ्यास करता असे आढळून येते की जड शारीरिक श्रमाचे काम (खणणे, ओझी वाहणे, लाकूड तोडणे) करावयाचे तर ५५ किलोग्रॅम वजन असलेल्या व्यक्तीस दरतासास २७५ कॅलरीज लागतात व मध्यम शारिरिक श्रमाच्या कामासाठी (खुरपणी, वेचणी इ.) ताशी १३७ कॅलरीज लागतात. दिवसाच्या २४ तासांपैकी साधारण ८ तास विश्रांती, ८ तास घरकाम व आंघोळ, जेवण इत्यादी व्यक्तिगत काम आणि ८ तास श्रमाचे काम असे सरासरी विभाजन लक्षात घेऊन दिवसाकाठी किती कॅलरीज लागतात ते पुढे दिले आहे.

| कामाचे स्वरुप | पुरुष (५५ कि. ग्रॅ. वजन) | स्त्री (४५ कि. ग्रॅ. वजन) |
|---|---|---|
| | दर दिवसास लागणाऱ्या कॅलरीज | |
| बैठे | २४०० | १९०० |
| शारीरिक श्रमाचे | | |
| मध्यम श्रमाचे | २८०० | २२०० |
| जड श्रमाचे | ३९०० | ३००० |

(इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च यांच्या 'रेकमेंडेड डायटरी इनटेक फॉर इंडियन्स' (१९८१) ह्या प्रकाशनावरून. पृ. ८)

याशिवाय शारीरिक वाढ व प्रकृती निकोप राहण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणात प्रथिने, व्हिटॅमिन्स इत्यादी मिळणे जरुरीचे असते. आणि म्हणून आहारात तृणधान्ये, कडधान्ये, दूध, भाजी, फळे, तेल इत्यादी सर्वांचा समावेश होणे आवश्यक असते. तसेच इंधन कपडे, पादत्राणे, राहती जागा, औषध, शिक्षण, प्रवास ह्याही गरजा विचारात घ्यावयास हव्या. यातील अन्नधान्याविषयीच्या गरजा शारीरिक गरजेच्या दृष्टिकोनातून केलेल्या अभ्यासावरून इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने सुचविलेल्या प्रमाणानुसार घेतल्या आहेत. तेल, दूध, भाजी, कपडे, निवारा ह्याबाबत किमान आवश्यक गरजेविषयीची आकडेवारी उपलब्ध आहे. पण किमान वेतन काढताना येथे फक्त तृणधान्ये व कडधान्ये ह्याविषयीची किमान गरज काय ते विचारात घेऊन 'उरलेल्या गरजांबाबत राष्ट्रीय नमुना पाहणीमध्ये अन्नधान्ये व इतर बाबी ह्यावरील खर्चाचे प्रमाण आधारभूत मानले आहे.

पती, पत्नी व तीन मुले असे पाच माणसांचे कुटुंब पायाभूत धरून त्यातील प्रौढ पुरुष एकक काढले. त्यासाठी निरनिराळ्या वयाच्या स्त्री-पुरुष व्यक्तींच्या अन्नाच्या गरजा लक्षात घेऊन इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च यांनी सुचविलेले प्रौढ पुरुष एकक प्रमाणभूत मानले. ह्या आधारे सरासरी कुटुंबामध्ये ४.० प्रौढ पुरुष एकक येतात.

अशा सरासरी कुटुंबास दरदिवशी एकूण १२३०० कॅलरीज लागतील तृणधान्यांद्वारा ही गरज मुख्यतः भागविली जाईल असे गृहित धरले आहे. कारण हेच सर्वात स्वस्त अन्न आहे. त्याबरोबरच प्रथिने मिळण्याच्या दृष्टीने कडधान्यांची किमान गरज लक्षात घेतली आहे. हे विचारात घेता दरदिवशी सरासरी आकारमानाच्या कुटुंबास ३ किलोग्रॅम ज्वारी व २६० ग्रॅम कडधान्ये ही किमान आवश्यक होत. अन्नधान्य सडणे, भरडणे, धुणे, शिजवणे इत्यादी प्रक्रियेत त्याचा कस काही प्रमाणात कमी होतो. त्यासाठी १० टक्के वाढावा देणे जरुरीचे आहे. तसेच आठवड्यातून सहा दिवस कामाचे व एक दिवस सुट्टीचा धरून सरासरी काढणे आवश्यक आहे. हे विचारात घेता एकूण दररोजची गरज ३.८५ किलोग्रॅम ज्वारी व ३३४ ग्रॅम कडधान्ये एवढी येते. राष्ट्रीय नमुना पाहणी व शेतमजूर पाहणीतील माहितीच्या आधारे शेतमजूर कुटुंबामध्ये सुमारे ४० टक्के खर्च अन्नधान्यावर व ६० टक्के इतर वस्तूंवर होतो असे दिसते. तेव्हा तृणधान्ये व कडधान्ये ह्या रूपात कुटुं-

ाची एकूण गरज पुढीलप्रमाणे येतें– ९.६२ किलोग्रॅम ज्वारी व ४० ग्रॅम कडधान्ये. त्यास चालू बाजारभावाने गुणून (ज्वारीचा भाव २ रुपये किलोग्रॅम व कडधान्यांचा ५ रुपये किलोग्रॅम) एकूण रोजची गरज २३.४४ रुपये येते. कुटुंबात दोन मिळवत्या व्यक्ती आहेत असे गृहित धरल्यास दर मिळवत्या कामकऱ्यामागे ११.७७ रुपये येतात. म्हणजे किमान वेतनाचा दर सुमारे १२ रुपये असावयास हवा.

वरील दर काढताना असे गृहित धरले आहे की (१) कुटुंबात वर्षभर सातत्याने काम करणाऱ्या दोन मिळवत्या व्यक्ती असतील, (२) आजारपण, इतर घरगुती अडचणी यांमुळे कामात अजिबात खंड पडणार नाही, (३) ह्या दोन मिळवत्या व्यक्तींना वर्षभर सतत काम उपलब्ध असेल (४) पुरुष व स्त्री यांना समान वेतन मिळेल. परंतु प्रत्यक्षात काय स्थिती असते?

शेतमजुरांना वर्षभर सतत मजुरीचे काम मिळत नाही. अडीअडचणींमुळे कामात खंड पडतो आणि स्त्रियांना पुरुषाच्या २।३ दराने मजुरी मिळते. १९७४ ७५ मध्ये श्रमिक कार्यालयामार्फत (लेबर ब्यूरो) केलेल्या ग्रामीण श्रमिकांच्या पाहाणीत शेतमजुरांच्या एका वर्षातील कामाचे दिवसांबद्दल महाराष्ट्र राज्यात पुढीलप्रमाणे सरासरी आढळली.

| | कामाचे दिवस | काम न मिळालेले दिवस |
|---|---|---|
| पुरुष | २७६ | ५९ |
| स्त्री | २१३ | ९० |

वरीलप्रमाणे कामाचे सरासरी दिवस विचारात घेतले व स्त्रियांचा मजुरीचा दर ९ रु. धरला तर किमान वेतन १२ रुपये नेमून दिले असता सरासरी रोजचा मजुरीचा दर सुमारे ७ रुपये एवढाच पडेल. अशा रीतीने रोजगार मिळाण्यातील अडचणींमुळे प्रत्यक्षात आवश्यकतेहून बरीच कमी मिळकत हाती पडणार अशी आज परिस्थिती आहे.

**तिसरी पागे समिती**– आता पागे समितीने किमान वेतन म्हणून काय दरांची शिफारस केली ते पाहू. (वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या माहितीच्या आधारे हे विवेचन केलेले आहे.)

| विभाग | दिवसाचा किमान वेतन दर (रुपये) |
|---|---|
| १) महानगरपालिका+बारमाही बागायत | १० |
| २) 'अ, ब' नगरपालिका+हगामी बागायत | ८ |
| ३) उर्वरित | ७ |
| ४) अवर्षण प्रवण | ६ |

पागे समितीने वरील दर ठरविताना अन्नधान्य व इतर प्राथमिक गरजा विचारात घेतल्या पण त्याबाबत जो आधारभूत प्रमाणे घेतली आहेत ती शास्त्रशुद्ध पद्धतीने घेतलेली आढळत नाहीत. किंबहुना साधारण किमान वेतन किती सुचवावे हे आधी ठरवून नंतर त्यास अनुरूप अशी आकडेमोड केली की काय असा येथे प्रश्न उपस्थित होतो. दर प्रौढ पुरुषामागे २००० ते २२०० कॅलरीजची आवश्यकता आहे असे प्रमाण पागे समितीने धरले. पण वर पाहिल्याप्रमाणे जड शारीरिक काम करणाऱ्या प्रौढ पुरुषास दरदिवशी ३९०० कॅलरींची आवश्यकता असते. म्हणजे मुळातच गरजेच्या जवळजवळ निम्मे प्रमाण घेतले. तसेच आहारातील अत्यंत आवश्यक अशा प्रथिनांचा वेगळा विचार केला नाही. फक्त ज्वारीच्या स्वरूपात सर्व वेतनाचा हिशोब केला. दर कुटुंबास दररोज फक्त ६ किलोग्रॅम ज्वारीच्या रूपात वेतन लागते असे धरून त्याच्या आधारे पुढील आकडेमोड केली. पायाभूत परिमाणच अशास्त्रीय पद्धतीने धरल्याने सर्वच हिशोब विवाद्य बनतो. ज्वारीची किमत सोलापूर केंद्राच्या किमतीच्या जवळपास (प्रत्यक्ष किमत रु. २.१६ होती) म्हणजे २ रुपये किलोग्रॅम धरून १२ रुपये किमान आवश्यक रक्कम आली व कुटुंबात दोन मिळवत्या व्यक्ती धरून ६ रुपये किमान वेतन आले. हे वेतन अवर्षणप्रवण भागासाठी सुचविले. इतर विभागांतील उत्पादकता अधिक असल्याने थोडचा अधिक दरांची शिफारस केली. परंतु महाराष्ट्रात बागायत शेती फारच मर्यादित क्षेत्रात आहे. महाराष्ट्रातील शेती बहुतेक कोरडवाहूच आहे. ह्या भागासाठी फक्त ६–७ रुपये म्हणजे गरजेच्या निम्याने किमान वेतन सुचविले आहे. अपुरे दिवस कामाची उपलब्धता, स्त्रियांना मिळणारे कमी वेतन इत्यादी लक्षात घेता, प्रत्यक्ष सरासरी रोजीचा दर ३ ते ३॥ रुपये एवढाच पडेल. शिवाय प्रत्यक्ष मजुरी किमान

मजुरीहून कमी दिली जाते हे वेगळेच. सरकारने नेमलेली समिती शेतमजुरांना किमान जीवनमान गाठता येईल एवढ्या वेतनाची शिफारस करू शकत नाही [illegible] वस्तुस्थितीची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे.

१९७४ पासून अनेक शेतमजूर संघटना आपल्या अनुभवाच्या–दैनंदिन गरजेच्या आधारे पागे समितीने मानभूत मानलेले ३ किलो ज्वारी हे वेतन अपुरे [आ]हे व ते वाढवून मिळाले पाहिजे ह्यासाठी झगडत [आ]हेत. शेतमजुरांबरोबर काम करणाऱ्या चेतना विकास [सं]स्था वर्धा येथील संघटनेचे डॉ. अभय बंग यांनी शेत[म]जुरांच्या आहारविषयक गरजा शास्त्रशुद्ध पद्धतीने [मां]डून पागे समितीची मांडणी कशी चुकीची आहे [त्य]ाकडे लक्ष वेधले. पागे समितीने आपली आहार[वि]षयक गृहीतकृत्ये शास्त्रशुद्ध निकषांवर तपासावी [या]साठी लोकविज्ञान संघटनेनेही प्रयत्न केले. आहार[वि]षयक शास्त्रीय भूमिका वैज्ञानिकांपुढे मांडून ह्या [मुद्द्य]ांवर विचारमंथनास चालना दिली. मराठी विज्ञान [परि]षदेच्या वार्षिक अधिवेशनात ह्या प्रश्नासंदर्भात [ठरा]व मांडला व तो संमत झाला. तसेच ह्या विषयाची [मांड]णी मराठीतून करून ही माहिती महाराष्ट्रातील [वेगवे]गळ्या शेतमजूर संघटनांना पुरविली. पागे [समि]तीने आहारविषयक शास्त्रीय पाया विचारात [घ्याव]ा असे आवाहन करणारे वैज्ञानिकांच्या सह्यांचे [पत्र]क, परिषदेचे ठराव इत्यादी सर्व पागे समितीकडे [पाठ]विले पण समितीने त्यास प्रतिसाद दिला नाही. [सम]ितीचे एक सदस्य, कामगार नेते कॉ. दत्ता देशमुख [यांनी] शिफारशींमधील अनेक त्रुटी दाखवून सुधारणा [करण्य]ासाठी प्रयत्न केला. पण अखेर भिन्न मतपत्रिका [देऊ]न त्यांना आपली भूमिका नमूद करावी लागली. [सम]ितीचा अहवाल सादर झाल्यावर त्यांमधील त्रुटी[ंवर] विस्तृत चर्चा होत आहे आणि शिफारशींमध्ये [सुधा]रणा करण्यासाठी शेतमजूर संघटनांकडून मागणी [केली जा]त येत आहे.

## [व्याप]क संदर्भात किमान वेतन

[कि]मान वेतनाच्या प्रश्नाचा विचार महाराष्ट्रातील [शेती]च्या प्रश्नाबरोबर करणे हेही तितकेच महत्त्वाचे [आहे.] अनेक लहान शेतकरी सुगीच्या हंगामात काही [दिवस] शेतमजूर लावतात तर एरवी ते स्वतः [मजूर] म्हणून राबतात. त्यांना कोणता दर परवडेल ? पावसाच्या अनिश्चिततेमुळे कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतीच्या उत्पादनात सतत चढउतार होते, त्यात किमतीतील अनिश्चिततेची भर पडल्याने त्यांना हुकमी उत्पन्न मिळत नाही त्यांची सरासरी उत्पन्नाची पातळी विचारात घेता कोणता दर परवडेल असे प्रश्न उपस्थित केले जातात व वाजवीपेक्षा कमी वेतनाचे समर्थन केले जाते. परंतु किमान वेतन देता येईल व शेतकऱ्यासही किमान वेतनाएवढे उत्पन्न शेतीपासून मिळेल एवढी उत्पादकता वाढली पाहिजे त्यासाठी कोणत्या प्रकारे शेती सुधारणा आवश्यक आहे ह्या दृष्टीने वरील प्रश्नाचा विचार झाला पाहिजे

गेल्या तीस वर्षांतील महाराष्ट्रातील शेतीची वाटचाल पाहिली तर उत्पादकता वाढीत महाराष्ट्र राज्याने फारशी प्रगती केली नाही असेच आढळते. शेतीच्या नियोजनाबाबत आमूलाग्र नवे धोरण स्वीकारुन शेतीची पुनर्रचना केल्याशिवाय महाराष्ट्रातील शेती सुधारणा साधणे जमणार नाही. महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती विचारात घेता जमिनीची शास्त्रीय पद्धतीने बांधबंदिस्ती व ओढेनाले यांवरील बांध, उतारावर झाडांची लागवड आणि पावसाचे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात जागच्याजागी मुरवून त्याची साठवणूक करणे अत्यावश्यक आहे. त्याबरोबरच जमिनीच्या कसाप्रमाणे चराऊ कुरणे, फळझाडांची लागवड व पिकांची योजना करणे आवश्यक आहे. यासाठी लहान लहान पाणलोट क्षेत्रातील जमिनीचा एकत्रित विचार करुन, नियोजन करावयास हवे. अशातऱ्हेने शास्त्रीय नियोजन केले तरच शेतीची उत्पादकता वाढू शकेल. परंतु यासाठी शेतमजूर व शेतकरी यांनी एकत्रित येऊन अशा संयोजनाचा आग्रह धरणे आणि रोजगार हमी योजनेखाली जमीन सुधारणा, पाणी साठवणूक व झाडांची लागवड अशा योजना राबवणे, ज्यायोगे त्यात राबणाऱ्या शेतमजुरास त्याचा पुढे फायदा मिळेल, यासाठी संघटित प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. अशा रीतीने शेती सुधारणेसाठी एकत्रित प्रयत्न व त्याचबरोबर किमान जीवनमानास आवश्यक असे वेतन मिळविणे हे दोन्ही लढे बरोबरीने पुढे गेल्यास किमान वेतनाचा प्रश्न घसास लागण्यास अधिक मदत होईल.

–सुलभा ब्रह्मे